(फक्त समाजाच्या सभासदांकरिता)

मराठा तितुका मेळवावा । महाराष्ट्र धर्म वाढवावा ।।

# मराठा विद्या प्रसारक समाज, नाशिक

(स्थापना सन १९१४)

पी.टी.आर. नंबर अे - ४३६

बहुजन हिताय बहुजन सुखाय

# घटना

**श्री.माणिकराव माधवराव बोरस्ते**
सभापती

**श्रीमती निलीमा वसंतराव पवार**
सरचिटणीस

संस्था नोंदणी कायदा १८६० या २१ व्या कायद्याप्रमाणे सन १९३२ साली
आणि मुंबई सार्वजनिक विश्वस्त कायदा १९५० च्या २९ व्या
कायद्याप्रमाणे सन १९५४ साली रजिस्टर झालेली संस्था

| | | |
|---|---|---|
| पहिली आवृत्ती | : | ३१.०८.१९५२ |
| दुसरी आवृत्ती | : | ३१.१०.१९६१ |
| तिसरी आवृत्ती | : | ०१.०१.१९६३ |
| चवथी आवृत्ती | : | ०१.०१.१९६९ |
| पाचवी आवृत्ती | : | ०१.०१.१९७३ |
| सहावी आवृत्ती | : | ०१.०३.१९८५ |
| सातवी आवृत्ती | : | ३१.०३.१९८७ |
| आठवी आवृत्ती | : | ३१.०३.१९९७ |
| नववी आवृत्ती | : | २६.०७.२००२ |
| दहावी आवृत्ती | : | १७.०६.२००६ |
| अकरावी आवृत्ती | : | ०१.०६.२००७ |
| बारावी आवृत्ती | : | ०१.०६.२०१२ |
| तेरावी आवृत्ती | : | ०१.०७.२०१७ |
| चौदावी आवृत्ती | : | १६.०३.२०२१ |
| पंधरावी आवृत्ती | : | ३१.०७.२०२२ |

## घटनेतील बदल आवृत्ती

१) घटना दुरूस्ती बदल अर्ज नं. १३४/८७ चा अर्ज मा.धर्मदाय उपायुक्त नाशिक यांनी दिनांक २८/४/१९८७ रोजी स्विकारला आहे. त्यास अनुसरून मुळ घटनेत सुधारणा सामील केलेल्या आहेत.

२) घटना दुरूस्ती बदल अर्ज नं. ४०७/२००२ चा अर्ज मा.धर्मदाय उपायुक्त नाशिक यांनी दिनांक १६/८/२००२ रोजी स्विकारला आहे. त्यास अनुसरून मुळ घटनेत सुधारणा सामील केलेल्या आहेत.

३) घटना दुरूस्ती बदल अर्ज नं. ५६६/२०११ चा अर्ज मा.धर्मदाय उपायुक्त नाशिक यांनी दिनांक २८/११/२०१९ रोजी स्विकारला आहे. त्यास अनुसरून मुळ घटनेत सुधारणा सामील केलेल्या आहेत.

४) दि. १४ जुन २०२२ रोजी झालेल्या विशेष सर्वसाधरण सभेने दिलेल्या मंजूरीस अनुसरून मुळ घटनेत सुधारणा सामील केलेल्या आहेत.

# मराठा विद्या प्रसारक समाज, नाशिक

## घटना

१. **नाव :**

संस्थेचे नाव मराठा विद्या प्रसारक समाज, नाशिक असे राहील.

२. **ठिकाण :**

समाजाचे मुख्य ऑफिस नाशिक शहर येथे राहील.

३. **वर्ष:**

समाजाच्या कामकाजाचे वर्ष १ एप्रिल ते ३१ मार्च अखेर राहील.

४. **ध्येय व उद्देश:**

समाजाचे ध्येय व उद्देश पुढीलप्रमाणे राहतील-

१) नाशिक जिल्ह्यातील व नाशिक जिल्ह्याबाहेरील मुख्यत: मराठा समाज शैक्षणिक, सामाजिक व आर्थिकदृष्ट्या मागासलेले वर्ग यांच्या सर्व प्रकारच्या शिक्षणाचा प्रसार करणे.

२) त्यासाठी पूर्व प्राथमिक व प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा व उच्च माध्यमिक शाळा, आयुर्वेदिक शाळा, शेतकी व औद्योगिक शाळा, वाणिज्य शाळा व महाविद्यालये, प्रशिक्षण महाविद्यालये, कला, विज्ञान व शेतकी महाविद्यालये, वसतिगृहे, वाचनालये, वैद्यकीय महाविद्यालय, औषध निर्मिती महाविद्यालये, विधी महाविद्यालये, शारीरिक शिक्षण महाविद्यालये, अभियांत्रिकी महाविद्यालये वगैरे संस्था काढणे.

३) अशा प्रकारच्या संस्थांना सरकारची मंजुरी व मदत मिळविणे.

४) आर्थिक मदत देऊन देशी व परदेशी उच्च शिक्षणाकरिता विद्यार्थी व विद्यार्थिनी पाठविणे.

५) शिक्षण सप्ताह, शिक्षण संमेलन व शिक्षण परिषद भरवून शिक्षणाचा प्रसार करणे व याबाबतीत अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेशी व इतर शैक्षणिक संस्थांशी सहकार करणे.

**सुधारणा:** दि. १४ जुन २०२२ रोजी झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेने दिलेल्या मंजूरीनुसार.

६) समाजाच्या कार्याचा प्रसार व वाढ होण्याकरिता कार्यकर्ते व प्रचारक तयार करणे.

७) अशाच प्रकारचे कार्य करणाऱ्या इतर संस्थांशी सहकार्य करणे व त्यांचे एकीकरण घडवून आणणे.

८) स्त्री-शिक्षणाचा प्रचार करणे.

९) वरील ध्येय साध्य होण्याकरिता निरनिराळे निधी उभारणे, ठेवी स्वीकारणे व जनतेने कोणत्याही स्वरूपात दिलेल्या आर्थिक व इतर मदतीचा स्वीकार करणे.

५. **शिक्षण शाखा :**

वरील ध्येय व उद्देश साध्य करण्याकरिता समाज विविध संस्था काढील. त्यात खालील प्रकारच्या शैक्षणिक संस्थांचाही समावेश राहील.

१) उच्च शिक्षण शाखा-कला, विज्ञान, वाणिज्य, शेतकी, अभियांत्रिकी, वैद्यकीय व इतर महाविद्यालये व इतर सर्व प्रकारच्या विश्वविद्यालयीन शिक्षण देणाऱ्या संस्था काढणे, उच्च शिक्षणाकरिता विद्यार्थी व विद्यार्थिनी पाठविणे व आय्.ए.एस्. व आय्.पी.एस्. सेंटर्स सुरू करणे.

२) दुय्यम शिक्षण शाखा-माध्यमिक शाळा, बहुउद्देशीय शाळा, तांत्रिक शाळा, उच्च माध्यमिक केंद्र शाळा, प्राथमिक अध्यापक विद्यालये, विद्या निकेतन इत्यादी.

३) प्राथमिक शिक्षण शाखा- पूर्व प्राथमिक शाळा, प्राथमिक शाळा, प्रॅक्टीसिंग स्कूल, आश्रम शाळा इत्यादी.

४) इतर शिक्षण शाखा- शेतकी व औद्योगिक शाळा, व्यापारी शाळा व आयुर्वेद शाळा, सहकारी शाळा, लष्करी शाळा इत्यादी.

५) वसतीगृह शाखा- मुलांची व मुलींची वसतिगृहे व त्यास जोडून असलेली शेती.

६) प्रकाशन शाखा- समाजाच्या शैक्षणिक कार्यासाठी पुस्तक प्रकाशन, छापखाना, शाळेची व महाविद्यालयांची मासिके, नियतकालिके, प्रसिद्धी पत्रके, जाहिराती व रिपोर्ट तयार करणे.

७) समाज शिक्षण शाखा-वाचनालय, वाङ्मय मंडळ, वक्तृत्व मंडळ, प्रचार मंडळ

८) संमेलन शाखा- स्नेह संमेलन, शिक्षण संमेलन, शिक्षण परिषद, उद्‌बोधन वर्ग, वाद्यवृंद, अतिथीगृह.

९) शारीरिक शिक्षण शाखा- शारीरिक शिक्षण देणाऱ्या निरनिराळ्या संस्था व सांस्कृतिक संस्था.

६. **समाजाचे सभासद :**

१) अठरा वर्षावरील कोणत्याही मराठा स्त्री पुरूषास जे करार करण्यास पात्र आहे त्यास समाजाचे सभासद होता येईल. मात्र सभासद होऊ इच्छिणाऱ्या व्यक्तीने परिशिष्ट 'अ' मध्ये नमूद केलेल्या सभासदत्वाचा अर्ज भरून वर्गणीसह कार्यकारी मंडळाला सादर केला पाहिजे. कार्यकारी मंडळाच्या मंजुरीशिवाय अशा व्यक्तीस समाजाचे सभासद समजले जाणार नाही. सभासदत्वाकरिता अर्ज छाननी करून कार्यकारी मंडळाच्या पुढील मिटींगवर ठेवण्यात यावेत.

२) जो सभासद निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर होण्यापूर्वी एक वर्ष समाजाचा सभासद असेल त्यासच निवडणुकीस उभे राहता येईल. ज्या सभासदाच्या अर्जास ३१ मार्चचे आत कार्यकारिणीने मान्यता दिली असेल त्यासच ३१ मार्चनंतर होणाऱ्या वार्षिक अगर विशेष सर्वसाधारण सभेत भाग घेता येईल व निवडणूक असल्यास मत देण्याचा अधिकार राहील.

३) आजीव सभासदास जरूर ती अधिक वर्गणी भरून आपला सभासदाचा वर्ग बदलून घेता येईल.

४) समाजाच्या सभासदाशिवाय इतरास समाजाच्या कोणत्याही सर्वसाधारण सभेत, कार्यकारी मंडळात अगर कार्यकारी मंडळाच्या उपसमितीत भाग घेता येणार नाहीत.

५) समाजाच्या कोणत्याही वर्गाच्या सभासदाचे वर्तन समाजाच्या ध्येय व धोरण यांचे विरुद्ध आहे असे आढळून आल्यास अगर सदरचा सभासद अन्य दृष्टीने समाजाचा सभासद राहण्यास पात्र नाही असे वाटल्यास कार्यकारी मंडळ त्याची वर्गणी परत न करता त्याचे सभासदत्व २/३ मताधिक्याने रद्द करू शकेल. मात्र अशा सभासदाविरुद्ध कारवाई करण्यापूर्वी त्यास नोटीस देऊन त्याचे म्हणणे ऐकून घेण्यास त्याला संधी दिली जाईल व अशा सभासदास येणाऱ्या वार्षिक सर्वसाधारण सभेपुढे अपिल करता येईल.

६) सभासद संख्या १४००० (चौदा हजार) पेक्षा जास्त असू नये.

७) सेवक सभासद संख्या जास्तीत जास्त ५०० (पाचशे) राहील.

**७. सभासदाचे वर्ग :**

समाजाच्या सभासदांचे घटना कलम ६ च्या पोटकलम (१) ला अनुसरून पुढीलप्रमाणे वर्ग पाडण्यात येतील.

१) देणगीदार- रू. १,००,०००/- व त्यापेक्षा जास्त देणगी देणारी.

२) आजीव सभासद- रू. ५,०००/- देणारे.

३) सेवक सभासद- समाजाच्या ७ वर्ष सेवेत व कायम नोकरीत असलेल्या शिक्षक सेवकास रू. ५०००/- वर्गणी दिल्यास समाजाचे सभासद होता येईल व त्यास घटना कलम १२ यात नमूद केल्याप्रमाणे सेवक सभासदांमधून जे ३ शिक्षक सेवक निवडावयाचे आहेत फक्त त्यांचे निवडणुकीस उभे राहता येईल. शिक्षक सेवक सभासदास समाजाचे अध्यक्ष, पदाधिकारी अगर सर्वसाधारण सभासदांमधून जे सदस्य निवडावयाचे आहेत त्यांचे निवडणुकीत उभे राहता येणार नाही.

**८. समाजाचे अध्यक्ष :**

१) समाजाचे अध्यक्ष व उपाध्यक्ष हे कार्यकारी मंडळाचे पदसिद्ध सभासद राहतील.

**९. सर्वसाधारण सभा :**

१) वरील कलम ७ मधील पोटकलम १ ते ३ मध्ये सांगितलेले समाजाचे सर्व सभासद मिळून समाजाची सर्वसाधारण सभा राहील.

२) वार्षिक सर्वसाधारण सभा आर्थिक वर्ष संपल्यावर ऑक्टोबर महिना संपण्याच्या आत बोलावली जाईल.

३) समाजाचे सरचिटणीस कार्यकारी मंडळाच्या सल्ल्याने वार्षिक अगर विशेष सर्वसाधारण सभा बोलावतील. परंतु काही कारणास्तव जर सरचिटणीसांनी सभा बोलावली नाही अगर बोलावण्याची टाळाटाळ केली तर कार्यकारी मंडळ ज्या पदाधिकाऱ्यास अगर सदस्यास सभा बोलावण्याचा अधिकार प्रदान करतील तो सदस्य अगर पदाधिकारी वार्षिक अगर विशेष सर्वसाधारण सभा बोलावतील.

४) सभेच्या कामाकरिता कमीत कमी ४०० सभासदांची गणपूर्ती धरली जाईल.

५) सभेची सूचना सर्व सभासदांना कमीत कमी १० दिवस अगोदर पोस्टाचा दाखला घेऊन अगर समक्ष देण्यात येईल. त्याचप्रमाणे स्थानिक चांगल्या खपाच्या दैनिकात प्रसिद्ध करण्यात येईल. सभासदास सभेची वैयक्तिक नोटीस मिळाली नाही या कारणास्तव सर्वसाधारण सभेचे कामकाज बेकायदेशीर ठरणार नाही.

**१०. वार्षिक सर्वसाधारण सभेची कामे व अधिकार :**

वार्षिक सर्वसाधारण सभेत साधारणपणे पुढील कामे होतील.

१) समाजाच्या कार्यासंबंधी स्थूल आढावा घेणे व पुढील धोरण ठरविणे.

२) समाजाचे व त्यांच्या सर्व शाखांचे हिशोब, ताळेबंद, अंदाजपत्रके व वार्षिक अहवाल मंजूर करणे.

३) समाजाचे व त्याच्या सर्व शाखांचे हिशोब तपासण्याकरिता हिशोब तपासणीस नेमणे.

४) निरनिराळ्या कामाकरिता उपसमित्या नेमणे.

५) कार्यकारी मंडळाने मंजुरीसाठी ठेवलेले विषय, ठराव अगर व्यवहार यांना मंजुरी देणे.

६) ज्या सभासदाचे सभासदत्व कार्यकारी मंडळाने रद्द केले आहे अशा सभासदाचे अपिलवार निर्णय घेणे.

७) समाजाचे अध्यक्ष,उपाध्यक्ष,पदाधिकारी व कार्यकारी मंडळाचे सदस्य यांच्या निवडणूक निकालाची नोंद घेणे.

८) समाजाचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सभापती, उपसभापती, सरचिटणीस व चिटणीस यांचे राजीनामे आल्यास त्यावर निर्णय घेणे व अशा पदाधिकाऱ्याची जागा रिकामी झाल्यास ती ठराव करून भरणे.

९) समाजाची स्थावर मालमत्ता विक्री करणे अगर भाडेपट्ट्याने देणे अगर अन्य रितीने तिची विल्हेवाट लावणे.

**११. विशेष सर्वसाधारण सभा :**

१) जरूर वाटल्यास सरचिटणीस कार्यकारी मंडळाच्या सल्ल्याने अगर कार्यकारी मंडळाने अधिकार प्रदान केलेला पदाधिकारी अगर सदस्य विशेष सर्वसाधारण सभा काही खास कामाकरिता बोलावू शकतील. त्याचप्रमाणे मताधिकार

असलेल्या सभासदांपैकी एक चतुर्थांश (१/४)अगर एक चतुर्थांश(१/४) हून अधिक सभासदांच्या लेखी मागणीवरून विशेष सर्वसाधारण सभा एक महिन्याचे आत सरचिटणीस अगर कार्यकारी मंडळाने अधिकार प्रदान केलेला पदाधिकारी अगर सदस्य बोलावतील.

२) सरचिटणीस यांनी मताधिकार असलेल्या एक चतुर्थांश (१/४) अगर एक चतुर्थांश (१/४) पेक्षा जास्त सभासदांच्या मागणीप्रमाणे विशेष सर्वसाधारण सभा न बोलाविल्यास अध्यक्ष विशेष सर्वसाधारण सभा बोलावतील, अध्यक्षांनी विशेष सर्वसाधारण सभा न बोलावल्यास उपाध्यक्ष विशेष सर्वसाधारण सभा बोलावतील.

३) विशेष सर्वसाधारण सभेची सूचना किमान सात दिवस अगोदर सर्व सभासदांना पोस्टाचा दाखला घेऊन अगर समक्ष देण्यात येईल. त्याचप्रमाणे स्थाानक चांगल्या खपाच्या दैनिकात प्रसिद्ध करण्यात येईल. सभासदास सभेची वैयक्तिक सूचना मिळाली नाही या कारणास्तव विशेष सर्वसाधारण सभेचे कामकाज बेकायदेशीर ठरणार नाही.

१२. **कार्यकारी मंडळ :**

१) कार्यकारी मंडळात अध्यक्ष, उपाध्यक्ष, सभापती, उपसभापती, सरचिटणीस, चिटणीस व १) नाशिक महानगरपालिका (महानगरपालिका क्षेत्रातील २० गावे वगळून) २) सटाणा ३) निफाड ४) चांदवड ५) सिन्नर ६) दिंडोरी व पेठ ७) कळवण व सुरगाणा ८) इगतपुरी ९) नांदगाव १०) येवला ११) मालेगाव १२) देवळा १३) नाशिक तालुक्यातील गावे, महानगर पालिका क्षेत्रातील २० गावे व त्र्यंबकेश्वर तालुका.

(२० गावे पुढील प्रमाणे: १) वडनेर, २) पिंपळगावखांब, ३) दाढेगाव, ४) पाथर्डी, ५) अंबड, ६) चुंचाळा, ७) कामटवाडा, ८) पिंपळगाव बहुला ९) गंगापूर, १०) आनंदवल्ली, ११) मखमलाबाद, १२) म्हसरूळ, १३) आडगाव, १४) नांदूर, १५)मानूर १६) पंचक, १७) दसक, १८) चाडेगाव, १९) वडाळा, २०) चेहडी)

या प्रत्येक मतदार संघासाठी एक याप्रमाणे निवडून आलेले सदस्य व प्राथमिक व माध्यमिक शिक्षक सेवक सभासदांमधून निवडून आलेले दोन सदस्य व उच्च माध्यमिक व महाविद्यालयीन शिक्षक सभासदांमधून निवडून

आलेले एक सदस्य राहतील. तसेच एका सभासदास एकाच पदाकरिता निवडणूक लढविता येईल.

१ (अ) कार्यकारी मंडळात महिलांना प्रतिनिधीत्व असावे म्हणुन दोन जास्तीच्या जागा कार्यकारी मंडळात निर्माण करण्यात आल्या आहे. त्या पदावर फक्त महिलांनाच उभे राहता येईल. मात्र त्यांना समाजाचे सर्व आजीव सभासद मतदान करतील.

२) कार्यकारी मंडळाची मुदत पाच वर्षांची राहील परंतु नवीन कार्यकारी मंडळाच्या निवडणुकीचा निकाल जाहीर झाल्यानंतर त्याच दिवशी जी वार्षिक सर्वसाधारण सभा होईल. ती सभा संपेपर्यंत जुने कार्यकारी मंडळ अधिकारपदावर राहील.

**१३. कार्यकारी मंडळाची सभा :**

१) शक्यतोवर महिन्यातून एकदा कार्यकारी मंडळाची सभा बोलाविली जाईल. मात्र दोन महिन्यांतून एकदा कार्यकारी मंडळाची सभा घेतलीच पाहिजे.

२) सभेकरिता ७ सभासदांची गणपूर्ती राहील. परंतु गणपूर्ती अभावी तहकूब झालेल्या पुढील सभेस गणपूर्तीची आवश्यकता राहणार नाही.

३) कार्यकारी मंडळाची सभा समाजाचे सरचिटणीस बोलावतील, परंतु सरचिटणीसांनी कार्यकारी मंडळाची सभा मुदतीत बोलाविली नाही अगर बोलावण्याची टाळाटाळ केली तर सभापती कार्यकारी मंडळाची सभा बोलावतील.

**१४. कार्यकारी मंडळाची कामे व अधिकार :**

१) समाजाच्या सर्व नोकरांसंबंधी कार्यकारी मंडळाचे पुढीलप्रमाणे अधिकार राहतील.

अ) त्यांची नेमणूक करणे, स्केल ठरविणे, बदली करणे, प्रमोशन देणे, कायम करणे व त्यांच्याकडून करारनामे करून घेणे.

अ) (१) संस्थेच्या सेवेत असणाऱ्या कोणाही सेवकाला कोणत्याही राजकीय पक्षाचा सभासद अथवा पदाधिकारी राहाता येणार नाही. जे सेवक राजकीय पक्षाचे सभासद अथवा पदाधिकारी असतील त्यांना राजकीय पक्षाचे सभासदत्वाचा अथवा पदाधिकारी पदाचा राजीनामा द्यावा लागेल.

अ) (२) संस्थेमध्ये सेवेत असणाऱ्या सेवकाला शिक्षक पतपेढी संघटना, लोकसभा, राज्यसभा, विधानसभा, विधानपरिषद या व्यतिरिक्त म्हणजे :-

अ) ग्रामपंचायत

ब) पंचायत समिती

क) जिल्हा परिषद

ड) नगरपालिका

इ) महानगरपालिका

फ) सर्व सहकारी संस्था

यांचे निवडुकीस उभे राहता येणार नाही/ निवडणुक लढविता येणार नाही. जे कोणी सेवक अशा प्रकारे निवडणुक लढवुन निवडुन येतील त्यांना आपल्या पदाचा राजीनामा द्यावा लागेल.

अ) (३) कोणाही सेवकाने वरील नियमाचा भंग केल्यास त्यास ताबडतोब नोकरीतुन काढुन टाकण्याचा अधिकार कार्यकारी मंडळाला राहील.

अ) (४) कोणाही सेवकास निवडणुक लढविण्याची परवानगी देण्याचा अधिकार कार्यकारी मंडळाला राहणार नाही.

ब) त्यांच्या नोकरीची मुदत वाढविणे, नोकरी वर्ग करणे, सेवामुक्त करणे व त्यांचे राजीनामे स्वीकारणे.

क) त्यांना विशिष्ट सवलती देणे अगर विशिष्ट कामाकरिता त्यांची निवड करणे.

ड) त्यांची चौकशी करून गुन्ह्याच्या स्वरूपाप्रमाणे त्यांना ताकीद देणे, दंड करणे, निलंबित करणे, वेतनवाढ थांबविणे, पदावनती करणे, काढून टाकणे अगर दुसरी योग्य ती शिक्षा देणे.

इ) किरकोळ रजेशिवाय इतर रजा मंजूर करणे.

२) समाजाच्या नवीन शाखा उघडणे अथवा दुसऱ्या संस्था संलग्न करून घेणे.

३) समाजाकरिता स्थावर मालमत्ता खरेदी करणे, गहाण टाकणे, भाडेपट्ट्याने घेणे, कर्ज उभारणे अगर कर्जाऊ पैसे देणे आणि इमारतीची व इतर बांधकामे करणे व समाजाकरिता निधी उभारणे.

४) समाजाच्या सर्व शाखांचे हिशोब तपासून मंजूर करणे व त्यात काही चूक असल्यास ती दुरुस्त करणे अगर योग्य तो इलाज करणे. तसेच ताळेबंद व

अंदाजपत्रक व अहवाल मंजूर करणे व वार्षिक सर्वसाधारण सभेपुढे मंजुरीसाठी ठेवणे.

५) पुढील बाबींविषयी नियम तयार करणे व त्यात जरूरीप्रमाणे वेळोवेळी फेरबदल करणे.

१) सभेच्या कामकाजासंबंधी.
२) समाजाच्या वाचनालयासंबंधी.
३) नोकरांच्या वर्तणुकीसंबंधी.
४) विद्यार्थ्यांच्या शिकवण्यासंबंधी.
५) नोकरांच्या कामाच्या वाटणीसंबंधी.
६) करारनामे, विमे व इतर कामासंबंधी.
७) स्थानिक सल्लागार मंडळाचे अधिकार ठरविणे.
८) समाजाच्या व शाखांच्या निधी व मालमत्ता यांची व्यवस्था ठेवणे.
९) समाजाच्या एखाद्या शाखेची चौकशी करणे व उपाययोजना करणे.
१०) समाजाचे सभासद होऊ इच्छिणाऱ्या व्यक्तीचे सभासदत्वास मंजुरी देणे अगर न देणे.
११) समाजाच्या सभासदांच्या गैरवर्तणुकीबद्दल चौकशी करून त्यावर जरूर ती कारवाई करणे.
कार्यकारी मंडळातील सदस्यांच्या रिकाम्या झालेल्या जागा कार्यकारी मंडळावर नवीन सदस्य स्वीकृत करून भरणे.
१२) समाजाच्या कोणत्याही वर्गाच्या सभासदाने राजीनामा दिल्यास अगर कार्यकारी मंडळाच्या सदस्याने राजीनामा दिल्यास तो मंजूर करणे.
१३) समाजाचे ध्येय व उद्देशानुसार योजना आखणे व त्यांची अंमलबजावणी करणे.
१४) कार्यकारी मंडळ चिटणीसाची कामे ठरवील.
१५) कार्यकारी मंडळ महाविद्यालयीन शिक्षण शाखांकरिता व समाजाचे इतर शैक्षणिक शाखांकरिता विद्यापीठाच्या व शासनाच्या नियमानुसार गव्हर्निंग कौन्सिल, ॲकेडेमिक कौन्सिल व इतर समित्या नियुक्त करील.

१६) विशिष्ट कामांसाठी समित्या नियुक्त करणे व आपले जरूर ते अधिकार सुपूर्त करणे.

१५. **सभांच्या कामांसंबंधी नियम :**

१) वार्षिक सर्वसाधारण सभेस अगर विशेष सर्वसाधारण सभेस समाजाचे अध्यक्ष गैरहजर असल्यास कार्यकारी मंडळाचे उपाध्यक्ष सभेचे अध्यक्ष म्हणुन काम करतील. उपाध्यक्ष गैरहजर असल्यास कार्यकारी मंडळाच सभापती सभेचे अध्यक्ष म्हणून काम करतील व सभापतीचे गैरहजेरीत उपसभापती सभेचे अध्यक्ष म्हणून काम करतील. सभापती व उपसभापती यांच्या गैरहजेरीत उपस्थित सभासद यांच्यापैकी एकास अध्यक्ष म्हणून निवडतील. एखाद्या ठरावावर सारखीच मते पडल्यास सभेच्या अध्यक्षांना एक निर्णायक मत देता येईल. गणपूर्ती अभावी तहकूब राहिलेल्या सभेस गणपूर्तीची जरूरी राहणार नाही व अशी सभा केव्हाही घेता येईल.

२) मिटींगचे काम सुरू होण्यापूर्वी सभापतीच्या परवानगीने जरूर तितके जादा विषय घेता येतील. परंतु तहकूब मिटींग किंवा विशेष सभा असल्यास त्यात जादा विषय घेता येणार नाहीत.

३) गणपूर्तीकरिता वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये व इतर सभांमध्ये अर्धा तास वाट पाहिली जाईल. या मुदतीत गणपूर्ती न झाल्यास अध्यक्ष सभा तहकूब करतील.

४) वेळेच्या अभावी सभा तहकूब राहिल्यास ती केव्हाही घेता येईल. मात्र अशा सभेस गणपूर्तीची जरूरी लागेल.

५) तहकुबीची सूचना केव्हाही आणता येईल व ती पास झाल्यास मिटींगचे काम बंद करता येईल.

६) कोणत्याही ठरावावर एक अगर अनेक उपसूचना मांडता येतील. मात्र त्या मूळ ठरावाच्या संपूर्ण विरुद्ध असू नयेत.

७) एकदा पास झालेल्या ठरावाच्या सर्वस्वी विरुद्ध ठराव तीन महिन्यांच्या आत पास करता येणार नाही. मात्र एकूण सभासदांच्या दोन तृतीयांश (२/३) सभासद अनुकूल असल्यास तो पास करता येईल.

८) ज्यावेळी सभासदात एकमत होणार नाही त्यावेळी कोणत्याही विषयाचा निकाल बहुमताने लावला जाईल.

९) कार्यकारी मंडळाच्या परवानगीशिवाय क्रमाने तीन सभांना गैरहजर राहणाऱ्या सभासदाचे सभासदत्व अगर पदाधिकाऱ्याचे पद रद्द होईल. परंतु सदस्यत्त्व रद्द करण्यापूर्वी सदर सदस्यास, पदाधिकाऱ्यास कारणे दाखवा नोटीस देऊन त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी देण्यात येईल. मात्र तहकूब सभा व विशेष सभा यात धरल्या जाणार नाहीत.

**१६. सरचिटणीसांची कामे व अधिकार :**

१) कार्यकारी मंडळाच्या सूचनेप्रमाणे समाजाचे व शाखेचे काम पाहणे.

२) समाजाचा पत्रव्यवहार करणे, दप्तर सांभाळणे व तद्‌संबंधी सर्व कामे पाहणे.

३) कार्यकारी मंडळाच्या व इतर सर्व सभा बोलाविणे व त्याची सूचना तयार करणे व सभांचे वृत्तांत ठेवणे.

४) कार्यकारी मंडळाच्या सल्ल्यानुसार व नियमानुसार समाजाचे हिशोब ठेवणे.

५) कार्यकारी मंडळाने सुपूर्त केलेल्या अधिकारानुसार काम करणे व अधिकार वापरणे.

६) समाजाच्या दैनंदिन कामकाजावर देखरेख व नियंत्रण ठेवणे.

**१७. समाजाचा निधी व मालमत्ता :**

१) समाजाची सर्व मालमत्ता व निधी समाजाच्या मालकीचा राहील. त्यावर कोणत्याही सभासदाची वैयक्तिक मालकी अगर अन्य हक्क राहणार नाही.

२) कार्यकारी मंडळाच्या मंजुरीने स्थावर मालमत्तेची खरेदी, गहाण, दान, भाडेपट्ट्याने घेणे अगर कोणत्याही व्यवहाराच्या दस्तऐवजावर सभापती व सरचिटणीस यांच्या सह्या राहतील. तसेच सर्वसाधारण सभेच्या मंजुरीने स्थावर मालमत्ता विक्री करणे अगर भाडेपट्ट्याने देणे या व्यवहारांच्या दस्तऐवजावर सभापती व सरचिटणीस यांच्या सह्या राहतील.

३) समाजाचा निधी कार्यकारी मंडळ ठरवील त्या बँकेत ठेवण्यात येईल. बँकेतून पैसा काढावयाचा झाल्यास सरचिटणीस अगर चिटणीस व सभापती अगर उपसभापती अशा दोघांच्या सह्यांनी काढण्यात येईल.

**१८. निवडणुकीसंबंधी :**

१) पदाधिकाऱ्यांच्या निवडणुकीसाठी ज्या सभासदाचे नाव आजीव सभासद म्हणून कोणत्याही तालुक्याच्या मतदार यादीत असेल त्यास पदाधिकाऱ्याच्या निवडणुकीत उभे राहाता येईल.

२) कार्यकारी मंडळाच्या सदस्यांच्या निवडणुकीकरिता ज्या सभासदाचे नाव घटना कलम १२ मधील ज्या तालुक्याच्या मतदार यादीत असेल त्यास त्याच तालुक्यातून निवडणुकीस उभे राहता येईल.

३) पदाधिकारी व कार्यकारी मंडळाच्या सदस्यांच्या निवडणुकीत प्रत्येक आजीव सभासदांच्या मतदार यादीतील मतदारास प्रत्येक पदाधिकाऱ्यास एक व प्रत्येक तालुक्यातील कार्यकारी मंडळाच्या सदस्यास एक या प्रमाणे मतदानाचा हक्क राहील.

४) शिक्षक सेवक मतदार संघातील प्राथमिक व माध्यमिक विभागातून ज्या दोन जागा आहेत. त्याकरिता एका उमेदवारास एक या प्रमाणे दोन व उच्च माध्यमिक व महाविद्यालयीन विभागातून निवडून द्यावयाच्या उमेदवारास एक याप्रमाणे मतदानाचा हक्क राहील.

५) एका मतदारास एकाच जागेकरिता उभे राहता येईल.

६) जो मतदार दुसऱ्या कोणत्याही शैक्षणिक संस्थेच्या कार्यकारी मंडळावर अगर व्यवस्थापक मंडळावर अगर विश्वस्त मंडळावर पदाधिकारी किंवा सदस्य असल्यास त्यास समाजाच्या अध्यक्ष अगर पदाधिकारी अगर कार्यकारी मंडळाचा सदस्य म्हणून निवडणूक लढविता येणार नाही. जर चुकीने एखादा मतदार (सभासद) वरील नियमांचा भंग करून निवडुन आला तर ती त्याची निवडणुक अवैध समजली जाईल व त्यास कोणत्याही प्रकारे संस्थेच्या कामकाजात भाग घेता येणार नाही व त्याचे सभासदत्व रद्द होण्यास पात्र राहील.

७) जो सभासद वेडा अगर दिवाळखोर ठरविला आहे त्यास यापुढे अगर ज्याला फौजदारी गुन्ह्यामध्ये तीन महिने किंवा त्यापेक्षा जास्त शिक्षा झालेली आहे अगर ज्या सभासदाचे नैतिक अध:पतन (Moral Turpitud) गुन्ह्यासंदर्भात शिक्षा झाली असेल तर अशा सभासदास निवडणुक लढविता येणार नाही अथवा पदाधिकारी म्हणुन काम पाहता येणार नाही व समाजाच्या कोणत्याही पदावर राहता येणार नाही.

८) ज्या आज़ीव सभासदांचे पत्ते संस्थेच्या हल्लीच्या रेकॉर्डप्रमाणे नाशिक जिल्ह्याचे बाहेरचे आहेत त्यांची नावे मतदार यादी करताना नाशिक तालुका मतदार संघात घातली जातील.

९) सदरची घटना दुरुस्ती मंजूर झाल्यापासून ६ महिन्यात म्हणजे दिनांक १६/८/२००२ पासून ६ महिन्यात कोणाही आजीव सभासदास लेखी अर्ज देवून पत्ता बदलून घेता येईल.

१०) घटनेतील तरतुदीस पात्र राहून कार्यकारी मंडळ समाजाचे अध्यक्ष व पदाधिकारी व कार्यकारी मंडळाचे सदस्यांचे निवडणुकीचे नियम तयार करतील.

**१९. घटना दुरुस्ती :**

समाजाचे घटनेत कोणतीही दुरुस्ती सूचवायची असल्यास ती समाजाचे चालू वर्ष संपण्यापूर्वी किमान एक महिना अगोदर मध्यवर्ती कार्यालयात लेखी पाठवावी. अशी दुरुस्ती कार्यकारी मंडळाने मंजूर केल्यास सदरची दुरुस्ती वार्षिक सर्वसाधारण सभेपुढे मांडण्यात येईल अशी दुरुस्ती हजर सभासदांच्या दोन तृतियांश मताने मंजूर झाल्यास घटनेत योग्य तो फेरफार करण्यात येईल.

****


ॐ
681 D

मराठा विद्या प्रसारक समाज

# मध्यवर्ती कार्यालय

शिवाजीनगर, गंगापूर रोड, नाशिक - ४२२ ००२.




किंमत साठ रूपये

म.वि.प्र. समाजाचे,
प्रिंटींग प्रेस, नाशिक - २.